<u>राज्यात आदिवासी क्षेत्रात ग्राम बाल विकास केंद्र (VCDC) आयोजित करण्याची योजना सुरू करणे बाबत.</u>

# महाराष्ट्र शासन

## महिला व बाल विकास विभाग

**शासन निर्णय क्रमांकः एबावि-२०१६/प्र.क्र.४३/(भाग-१ ब)/का.५**

३ रा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

**दिनांक :- २५ ऑक्टोबर. २०१६**

**संदर्भ:- महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.एबावि-२००९/प्र.क्र.१८१/का-५, दिनांक १७ सप्टेंबर २०१०.**

**<u>प्रस्तावना :-</u>**

कुपोषणाच्या समस्येवर मात करण्यासाठी शासनाने गेल्या काही वर्षात विविध उपाययोजना केल्या आहेत. कुपोषणावर मात करण्यासाठी पूरक पोषण आहार देणे आणि वेळीच आवश्यक आरोग्य सेवा पूरविणे या दोन्ही महत्वाच्या बाबी आहेत. किंबहुना पूरक पोषण आणि आरोग्य सेवा या दोन्ही एकत्रितपणे आणि समन्वयाने पुरविल्या तरच हा प्रश्न सोडविता येईल. प्रत्येक कुपोषित बालकावर जाणिवपूर्वक उपाययोजना करणे आवश्यक असते. ही उपाययोजना अंगणवाडी केंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र, उपजिल्हा रुग्णालय, जिल्हा आरोग्य रुग्णालय, स्त्री रुग्णालय व वैद्यकिय महाविद्यालय या विविध पातळीवर करण्याची आवश्यकता असते, असे शासनाच्या निदर्शनास आले आहे. म्हणून अंगणवाडी स्तरावर ग्राम बाल विकास केंद्र स्थापन करून सॅम (SAM) उपचार करण्याची योजना प्रस्तावित करण्यात येत आहे. यापूर्वी केंद्र शासनाच्या निधीतून राज्यात ग्राम बाल विकास केंद्र (VCDC) योजना आरोग्य विभागाकडून सुरू होती. यासाठी केंद्राकडून मिळणारा निधी बंद झाल्याने सदरची योजना राज्यात बंद करण्यात आली होती. त्यानुषंगाने आदिवासी क्षेत्रातील लहान बालकांच्या कुपोषणावर प्रभावीपणे मात करण्यासाठी ग्राम बाल विकास केंद्र (VCDC) योजना सुरू करून अंमलबजावणी करण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u> :-**

उपरोक्त प्रस्तावनेत नमूद केल्याप्रमाणे राज्यातील आदिवासी क्षेत्रात ग्राम बाल विकास केंद्र (VCDC) योजना राबविण्यासाठी अपेक्षित रू.१७.११ कोटी एवढी रक्कम प्रदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. ग्राम बाल विकास केंद्र (VCDC) ही योजना सदरचे आर्थिक वर्ष ( सन २०१६-१७) गृहित धरून पुढील ३ आर्थिक वर्षांकरिता सुरू राहील. तद्नंतर या योजनेच्या फलनिष्पत्ती व मूल्यमापनाच्या आधारावर पुढील निर्णय घेण्यात येईल. सदर योजनेचे स्वरूप खालीलप्रमाणे असेल-

३. योजनेचे स्वरुप व अंमलबजावणी :-

१. ग्राम बाल विकास केंद्र (VCDC) योजनेचे संनियंत्रण अधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद हे राहतील. एका केंद्रात जास्तीत जास्त १५ सॅम बालकांचा समावेश राहील.

२. अंगणवाडी सेविका ६ महिन्यापासून ६ वर्षापर्यंतच्या बालकांची उंची घेऊन SAM/ MAM नोंद वही जतन (register maintain) करतील आणि SAM बालकं स्थानिक Aasha/ANM मार्फत तातडीने वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणली जातील . पुढील ४८ तासांच्या आत ANM / प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकिय अधिकारी (PHC Doctor) ते बालक SAM श्रेणीतील (Category) आहे किंवा नाही याबाबत दाखला (Certificate) देतील व त्यानंतरच SAM बालकाला ग्राम बाल विकास केंद्रात (VCDC) दाखल करण्यात येईल .

३. दुसऱ्या दिवशी आशा वर्कर ग्राम बाल विकास केंद्राला (VCDC) भेट देतील व आठवडयातून एकदा ए.एन.एम./ प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकिय अधिकारी ग्राम बाल विकास केंद्राला (VCDC) भेट देतील व सर्व बालकांची तपासणी/चाचणी करतील. ज्या बालकांमध्ये वाढ/सुधारणा दिसणार नाही त्यांच्या बाबतीत पुढील वैद्यकिय उपचार केले जातील.

४. अंगणवाडी सेविकांनी बालकांची दरमहा वजन आणि उंची घेवून बालकांची वर्गवारी साधारण, कुपोषित आणि अति कुपोषित (NORMAL,MAM & SAM) अशी करतील.

५. बालकास ग्राम बाल विकास केंद्रात (VCDC) दाखल केल्यानंतर सकाळी ०८ ते दुपारी १२ तसेच सांयकाळी ४ ते ७ या वेळेत उपचार केले जातील. त्या बालकांना व त्यांच्या पालकांना पुढील ३० दिवस सलगपणे अंगणवाडीत यावे लागेल.

६. अंगणवाडी सेविका ग्राम बाल विकास केंद्र (VCDC) चालवतील व बालकांना, अंगणवाडीतून एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत दिला जाणारा सकाळचा नाश्ता तसेच पूरक पोषण आहार या व्यतीरिक्त ३ वेळा असा दिवसातून पाच वेळा आहार शिजवून उपलब्ध करून देण्याची जबाबदारी अंगणवाडी सेविका यांची राहिल

७. त्याशिवाय या मुलांची दर आठवडयाला वैद्यकीय तपासणी अंगणवाडी स्तरावर केली जाईल. अंगणवाडी सेविका/आशा वर्कर दर आठवडयाला SAM बालकांच्या तब्येतीतील तपशिल (Record) जतन करतील.

८. SAM बालकांचा सांभाळ करण्यासाठी जी महिला /पालक सोबत येईल तिला/त्याला बुडीत मजूरी दिली जाईल शिवाय एक वेळचा जेवणाचा खर्चही दिला जाईल.

९. प्रत्येक बालकाची ग्राम बाल विकास केंद्रातील ( VCDC) भरती जास्तीत जास्त १ महिन्यासाठीच राहील. नंतर त्याला ए.एन.एम./ प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी यांनी प्रमाणित केल्यानंतर अंगणवाडी सेविकेमार्फत ग्राम बाल विकास केंद्रामधून मुक्त( discharge)करण्यात येईल. तद्नंतर पुढील सहा महिन्यांपर्यंत दर आठवडयाला अंगणवाडी सेविका व आशा वर्कर गृह भेटी देतील व बालकाच्या प्रकृतीवर लक्ष दिले जाईल. SAM

बालकाच्या तब्येतीत सुधारणा होत नसल्यास प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत संदर्भ रुग्ण (Referral patient) म्हणून दखल घेतली जाईल .

१०.ग्राम बाल विकास केंद्र (VCDC) योजना कार्यान्वित करण्यासाठी अंगणवाडी केंद्राला दरवर्षी नियमित खर्च दिला जाईल. सुशोभिकरण, फलक तक्ता, उंची-वजन तक्ता इ. खरेदी करण्यासाठी तो वापरण्यात येईल.

११.ग्राम बाल विकास केंद्रामध्ये (VCDC) जास्त तासासाठी काम करण्याबद्दल अंगणवाडी सेविकेला वाढीव मानधन, मजूरी व इंधन दिले जाईल.

१२.अंगणवाडी सेविका तसेच आशा वर्करकडून SAM बालकांसोबतच्या पालकांचे समुपदेशन/ प्रबोधन करून बालकांची काळजी घेण्याबाबतच्या, पोषण आहार तसेच आरोग्य व आहार विषयक चुकीच्या सवयींमध्ये सुधारणा/बदल करण्याबाबत अवगत केले जाईल.

१३.या योजनेअंतर्गत सर्व SAM बालके/ मातांना/काळजी वाहकास सर्व सुविधा आधार Linked च दिल्या जातील.

४. अशा प्रकारे एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत पुरविण्यात येणारी सेवा आणि सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत नियमित चाचणी, औषधी उपलब्धता यांची सांगड घालून ग्राम बाल विकास केंद्रामार्फत( VCDC) उपाययोजना केली जाईल.

५. आदिवासी क्षेत्रासाठीबाल ग्राम विकास केंद्र (VCDC) योजना लागू करण्यासाठी प्रती बालक प्रती दिन खर्चाचा तपशील व वित्तीय निकष खालील प्रमाणे राहिल-

| **अ.क्र.** | **बाब** | **प्रति दिन प्रति बालक खर्च** |
|---|---|---|
| १ | तीन वेळेचा आहार | रु. २०.०० |
| २ | औषधी शक्यतो प्राथमिक आरोग्य केद्रातून घ्यावे | रु. ८.०० |
| ३ | अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना वाढीव मानधन, मजुरी व इंधन एकत्रित | रु. १२.०० |
| | **एकुण अ** | रु. ४०.०० |
| ४ | बालकाच्या पालकाच्या बुडीत मजूरीपोटी द्यावयाची रक्कम | रू. ८०.०० |
| ५ | बालकाच्या पालकाला आहार | रू. २५.०० |
| ६ | मायक्रोन्युट्रीयंट/स्प्रींकल्स/इतर औषधी इ. साठी | रू. १५.०० |
| | **एकुण ब** | रू. १२०.०० |
| | **एकुण (अ+ब)** | **रू. १६०.००** |

६. आदिवासी क्षेत्रासाठी बाल ग्राम विकास केंद्र (VCDC) योजना लागू करण्यासाठी वित्तीय भार खालील प्रमाणे राहिल.

| **अ.क्र.** | **बाब** | **प्रती दिन प्रती बालक खर्च** |
|---|---|---|
| | **बालकांवरील उपचाराचा प्रती दिन खर्च** | **रु.१६०/-** |
| १ | उपचाराच्या दिवसांची संख्या | ३० |
| २ | उपचारावरील दर बालक एकूण खर्च | १६०X३० = रू. ४८००/- |
| ३ | महाराष्ट्र राज्यातील अंदाजीत सॅम बालकांची प्रती वर्ष संख्या(मागील तीन वर्षातील सरासरी आकडेवारी पाहता, जवळजवळ एकूण बालकांच्या १.३ टक्के बालके सॅम म्हणून नोंदविण्यात आली आहेत.) | ३३६२८ |
| | महिन्याचा बालकांवरील एकूण उपचार खर्च **(अ)** | ३३६२८X४८००= १६.१४ कोटी |
| | **अंगणवाडी पायभूत सुविधा खर्च** | |
| १ | प्रती अंगणवाडी पायाभूत खर्च (दरवर्षी) | रू. ४००/- |
| २ | आदिवासी क्षेत्रातील एकूण अंगणवाडयांची संख्या | १६०३४ |
| ३ | अंगणवाडयांच्या पायभूत सुविधांवरील एकूण खर्च (गरजेप्रमाणे) **(ब)** | ४००X१६०३४= ०.६४ कोटी |
| | **प्रशासकीय खर्च** | |
| १ | प्रशासकीय किंमत व खर्च (एकूण किंमतीच्या / खर्चाच्या २ टक्के) (यात योजनेचे स्वायत्त संस्थेकडून Autonomus Agency) मूल्यमापनाचा खर्च तसेच योजनेच्या संनियंत्रणाकरिता आवश्यक Electronically Record Maintainace करिता दरमहा VCDC ची माहिती घेणे इ. संबंधी खर्च याचा समावेश आहे.) **( क)** | ०.३३ कोटी |
| | **एकूण अंदाजित खर्च अ + ब + क** | **रुपये १७.११ कोटी** |

(उपरोक्त विवरण पत्र मासिक प्रगती अहवाला प्रमाणे SAM बालकांची संख्या परिगणित करून तयार करण्यात आले आहे. तथापि, काही वर्षांमध्ये SAM बालकांच्या आकडेवारीत बदल होवू शकतो.)

७. अशाप्रकारे राज्यातील आदिवासी क्षेत्रातील अंगणवाडयांमध्ये ग्राम बाल विकास केंद्र ( VCDC) योजना सुरू करण्यासाठी आवश्यक रू. १७.११ कोटी इतका नियतव्यय मान्य करण्याबाबत वित्तीय व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

८. सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१६१०२५१७२९५५७८३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajagopal Devara

Digitally signed by Rajagopal Devara
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tribal Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=289c22071cb588fd531df022c29ec89276ede6f8aa500df11ff3b1b80b6962cd, cn=Rajagopal Devara
Date: 2016.10.25 17:39:09 +05'30'

**( राजगोपाल देवरा )**
**सचिव**
**आदिवासी विकास विभाग**

**( संजय कुमार)**
**अपर मुख्य सचिव**
**महिला व बाल विकास विभाग**

**प्रति,**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२) मा.मुख्यमंत्री यांचे सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई
३) मा.विरोधी पक्ष नेता, विधान भवन, मुंबई
४) मा.मंत्री/राज्यमंत्री, महिला व बाल विकास, मंत्रालय, मुंबई
५) सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री, सर्व विभाग, मंत्रालय, मुंबई
६) सर्व विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई
७) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई
८) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व विभाग, मंत्रालय,मुंबई
९) महासंचालक, राजमाता जिजाऊ माता-बाल आरोग्य व पोषण मिशन,नवी मुंबई
१०) महासंचालक, महिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
११) सर्व मंत्रालयीन विभाग
१२) आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे
१३) आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई
१४) सचिव, बाल हक्क संरक्षण आयोग, महाराष्ट्र राज्य
१५) सदस्य सचिव, राज्य महिला आयोग, महाराष्ट्र राज्य
१६) महालेखापाल, ( लेखा व अनुज्ञेयता)(लेखा परिक्षा), महाराष्ट्र, मुंबई /नागपूर
१७) सर्व विभागीय आयुक्त, महाराष्ट्र राज्य
१८) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ग्रंथालय, विधानभवन, मुंबई
१९) सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य
२०) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, महाराष्ट्र राज्य
२१) सर्व विभागीय उप आयुक्त, महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र राज्य
२२) सर्व जिल्हा व महिला बाल विकास अधिकारी, महाराष्ट्र राज्य
२३) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य

२४) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२५) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
२६) वित्त विभाग (व्यय-६), मंत्रालय, मुंबई
२७) नियोजन विभाग, का.१४७२, मंत्रालय, मुंबई
२८) सर्व उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (बाल कल्याण), जिल्हा परिषद, महाराष्ट्र राज्य
२९) सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी ( ग्रामीण/आदिवासी/नागरी ), महाराष्ट्र राज्य
३०) सर्व अधिक्षक/अधिक्षिका, शासकीय संस्था, महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र राज्य
३१) सर्व अधिकारी व कार्यासने, महिला व बाल विकास, मंत्रालय, मुंबई
३२) निवड नस्ती ( कार्यासन -५)